# उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र. उमपा/कर विभाग/३५ | ३८ | २०२३
दिनांक : | ०८ | २०२३

विषय- कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ३५सीओ०२०७३८३०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे कर निर्धारणाबाबत

संदर्भ- श्री. प्रदीप टी बेहरानी, बेहरानी प्राईड, स्टेशन रोड, उल्हासनगर-३ यांचेकडील दिनांक १४/८/२०२३ (प्राप्त दिनांक १७/०८/२०२३) रोजीचा अर्ज.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ३५सीओ०२०७३८३०० (बेहरानी प्राईड, तळमजला, शॉप नं ए पोर्शन ऑफ प्लॉट नं १५० सेक्शन ५ स्टेशन रोड उल्हासनगर- ३) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमतः पात्र व्यक्ती म्हणुन प्रदीप ठाकुरदास बेहरानी (पीएमसी बँक) अशी नोंद आहे.

सदरील मिळकतीचा पीएमसी बँक भाडे तत्वावर वापर करीत असल्याने वार्षिक भाडे रक्कम रु. २१,७३,५००/- विचारात घेवुन कर आकारणी करण्यात आली आहे त्याअनुषंगाने वर्ष २०२२-२०२३ पर्यंत कराचा भरणा करण्यात आला आहे.

श्री. प्रदीप टी बेहरानी यांनी संदर्भिय अजार्न्वये सदर मिळकत पीएमसी बँकेने खाली केली असुन सदयस्थितीत युनिटी स्मॉल फायनान्स बँक यांना भाडयाने देण्यात आली आहे. सोबत सह दुय्यम निबंधक वर्ग-२ उल्हासनगर क्र. १ यांचे कार्यालयाकडील नोंदणीकृत (अनुक्रमांक ३१५२/२०२३ दिनांक ०७/०८/२०२३) लिव्ह ॲण्ड लायसन्सची प्रत सादर केली आहे. तसेच वर्ष २०१६-२०१७ पासुन भांडवली मुल्याधारीत कर आकारणी करणेबाबत विनंती केली आहे.

शासनाकडील नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र युएमसी-२५२२/ प्र.क्र.४९०/ नवि-२१. दिनांक १४ मार्च २०२३ उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात लागू करण्यात आलेल्या भांडवली मूल्य आधारीत मालमत्ता कर आकारणीबाबत पुढीलप्रमाणे निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत भांडवली मूल्य आधारीत कर प्रणाली लागू करण्यापूर्वी ज्या पध्दतीने करयोग्य मूल्य देयके देण्यात येत होती. त्या पध्दतीने देयके देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर कर प्रणाली जागू करतांना, यापुढे कोणत्या दिनांकापासून/आर्थिक वर्षापासुन लागू करावी, याबाबत सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने निर्णय घ्यावा. त्याअनुषंगाने वर्ष २०२३-२०२४ करीता करयोग्य मूल्य आधारीत बिले बजावण्यात आली आहेत.

सदयस्थिती मिळकतीची पाहणी केली असता मिळकतीचा वापर युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड करीत असल्याचे दिसुन आले आहे. तसेच प्रदीप ठाकुरदास बेहरानी व युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांचे दरम्यान सह दुय्यम निबंधक वर्ग-२ उल्हासनगर क्र. १ यांचे कार्यालयाकडील नोंदणीकृत (अनुक्रमांक ३१५२/२०२३ दिनांक ०७/०८/२०२३) लिव्ह ॲण्ड लायसन्स नुसार दिनांक १ एप्रिल २०२३ ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीकरीता रक्कम रु ७०,५००/- प्रतिमाह भाडे निश्चित करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

उक्त बाबी पाहता उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ३५सीओ०२०७३८३०० (बेहरानी प्राईड, तळमजला, शॉप नं ए पोर्शन ऑफ प्लॉट नं १५० सेक्शन ५ स्टेशन रोड उल्हासनगर- ३) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता नोंदणीकृत (अनुक्रमांक ३१५२/२०२३ दिनांक ०७/०८/२०२३) लिव्ह अॅण्ड लायसन्स नुसार दिनांक १ एप्रिल २०२३ ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीकरीता रक्कम रु ७०,५००/- प्रतिमाह भाडे विचारात घेवुन वर्ष २०२३-२०२४ करीता कर आकारणी निश्चित करणे तसचे नावात प्रदीप ठाकुरदास बेहरानी (युनिटी स्मॉल फायनान्स बॅक) अशी दुरुस्ती करणेकामी शिफारस करण्यात आली आहे

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ३५सीओ०२०७३८३०० (बेहरानी प्राईड, तळमजला, शॉप नं ए पोर्शन ऑफ प्लॉट नं १५० सेक्शन ५ स्टेशन रोड उल्हासनगर- ३) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता नोंदणीकृत (अनुक्रमांक ३१५२/२०२३ दिनांक ०७/०८/२०२३) लिव्ह अॅण्ड लायसन्स नुसार दिनांक १ एप्रिल २०२३ ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीकरीता रक्कम रु ७०,५००/- प्रतिमाह भाडे विचारात घेवुन वर्ष २०२३-२०२४ करीता कर आकारणी निश्चित करुन नावात प्रदीप ठाकुरदास बेहरानी (युनिटी स्मॉल फायनान्स बॅक) अशी दुरुस्ती करावी

18/08/23

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,
मे कोल्ब्रो ग्रुप नागपूर

Scanned with CamScanner